| | |
|---|---|
| | **पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड**<br>पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे ३३ |
| | **दिनांक - १५/०२/२०२४** |

## खंडणी विरोधी पथकाची कारवाई

### खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्हयात १० वर्षापासून फरारी असणाऱ्या दोन सख्या भावांना अटक

मा.पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे यांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पाहीजे / फरारी आरोपींचा शोध घेवुन, त्यांना अटक करण्याची विशेष मोहीम राबविणेबाबत दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने, पाहीजे / फरारी आरोपींची यादी तयार करुन, सर्व पोलीस ठाणे व गुन्हे शाखा यांना देवुन, त्यांना अटक करण्याची विशेष मोहीम राबविण्यात आली आहे. त्या अनुषांगने गुन्हे शाखांच्या सर्व अधिकारी यांना पाहीजे / फरारी आरोपींचा शोध घेवुन, त्यांना अटक करणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.

त्यानुसार मा. पोलीस उप-आयुक्त, गुन्हे श्री संदीप डोईफोडे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे श्री सतिश माने व वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री वैभव शिंगारे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेकडील खंडणी विरोधी पथकाचे पोलीस उप-निरीक्षक अशोक जगताप तसेच पोहवा विजय नलगे, पोना शैलेश मगर व पोअंम प्रदीप गुट्टे हे पाहीजे / फरारी आरोपीची माहिती काढत असतांना, पोना शैलेश मगर यांना बातमी मिळाली की, वाकड पो. स्टे. गुरनं. ६४/२०१४ भादवि कलम ३०७,१४३,१४७,१४८,१४९ या गुन्हयातील पाहीजे आरोपी विकी सहाणी उर्फ निशाद व राजन सहाणी उर्फ निशाद हे गायकवाड डेअरी, कुबेर बिल्डिंग, दत्तमंदीर रोड, वाकड, पुणे येथे पेटींगचे काम करत आहेत. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने, सदर ठिकाणी जावुन, सापळा लावुन, १) विकी सुरेंद्र सहाणी उर्फ निशाद वय-२९ वर्षे रा. समर्थ दुध डेअरी पाठीमागे, समर्थ कॉलनी, पिंपळे सौदागर, पुणे व २) राजन सुरेंद्र सहाणी उर्फ निशाद वय-४० वर्षे रा. हनुमान मंदीराजवळ, श्रीराम निवास, औंधगाव, पुणे यांना ताब्यात घेवुन, त्यांचेकडे तपास करता, त्यांनी गुन्हा केल्याची तोंडी कबुली दिल्याने, व वाकड पोलीस ठाणे येथील अभिलेखाची तपासणी करता ते वाकड पो. स्टे. गुरनं. ६४/२०१४ भादवि कलम ३०७,१४३,१४७,१४८,१४९ या गुन्हयात पाहीजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाल्याने, त्यांना पुढील कार्यवाही कामी वाकड पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा.विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा.वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त, मा. डोईफोडे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा.सतिश माने, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव शिंगारे सहा.पोलीस निरीक्षक सागर काटे, पोलीस उप-निरीक्षक अशोक जगताप, तसेच पोलीस अंमलदार विजय नलगे, शैलेश मगर, सुनिल कानगुडे, किरण काटकर, प्रदीप गुट्टे यांचे पथकाने केली आहे.

**(संदीप डोईफोडे)**
**पोलीस उप-आयुक्त,**
**गुन्हे, पिंपरी चिंचवड**